# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०४/२०२४ (गुरूवार)**

**पोस्टे कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी , पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगाव व खाणगाव , पोस्टे जलालखेडा हद्दीतील उमठा येथिल पारधी बेडा व शिवारात**

**अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर स्थागुशा ची धडक कारवाई**

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. १८/०४/२०२४ रोजी मौजा पोस्टे कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी , पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगाव ,खाणगाव व पोस्टे जलालखेडा हद्दीतील उमठा येथील पारधी बेडा व शिवारात मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे **एकुण १२ महिला व १० पुरूष आरोपी** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून १) ८०५ लिटर मोहाफूल गावठी दारू ५०/— रू. लिटर प्रमाणे कि. ४०२५०/—रू. २) १९,७०० लिटर मोहाफूल सडवा रसायन किंमती २०/— रु लिटर प्रमाणे ३,९४,०००/—रू. ३) प्लास्टिक ड्रम व इतर साहित्य किंमती ८४,८५०/—रू. असा एकुण किंमती ५,१९,१००/— रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. एकुण २२ आरोपींवर पो.स्टे काटोल , जलालखेडा कळमेश्वर, येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, पोउपनि आशिष मोरखडे,सफौ सुरज परमार , चंद्रशेखर घडेकर ,नाना राऊत, पोहवा निलेश बर्वे, विनोद काळे, संजय बांते , दिनेश अदापुरे, इक्बाल शेख, मयुर ढेकळे, प्रमोद भोयर, मिलींद नांदुरकर, राजू रेवतकर, रोहन डाखोरे, आशिष मुंगळे, उमेश फुलबेल , आशिष भुरे, अविनाश राउत, किशोर वानखेडे, मपोहवा नितु रामटेके, कविता बचले, वनिता शेंडे, नापोशि अमृत किनगे, निलेश पिपरोदे, राकेश तालेवार, होमेश्वर वाईलकर, चालक मोनु शुक्ला पोलीस अंमलदार अभिषेक देशमुख, निलेश इंगुलकर, चापोहवा अमोल कुथे चालक पोशि सुमीत बांगडे ,आशुतोश लांजेवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर



## दिनांक  १८/०४/२०२४ (गुरूवार)

### पोलीस स्टेशन कुही हद्दीत घरफोडया करणा—या गुन्हेगाराला अटक

पोलीस स्टेशन कुही हद्दीतील मांगली शिवारातील डॉ. मिलींद उल्लेवार यांच्या शेतातील फार्म हाउस मध्ये कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून एल सी डी टीव्ही, म्युजिक सिस्टम व ईतर साहित्य चोरी करून घेवुन गेलयाचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कुही येथे घरफोडी चा गुन्हा नोंद करून तपासात घेतला असता कुही पोलीसांच्या पथकाने सदर परिसरात रात्रगस्त वाढवुन तसेच गुन्हयाचा तांत्रिकदृष्टया तपास करून आरोपी नामे भगवान रामचंद्र राउत वय ३८ वर्ष रा शिरूर ता कामठी ह मु मातोश्री नगर वानाडोंगरी नागपुर याला अटक करून त्याचेकडुन एल सी डी टीव्ही, व म्युजिक सिस्टम गुन्हयात वापलेले मोटारसायकल जप्त करण्यात आले.

कार्यवाही पथक मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, भापोसे तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार भापोसे दिपक अग्रवाल पोस्टे कुही ,सपोनि अमितकुमार आत्राम , पोउपनि स्वप्नील गोपाले, सफौ संजय कुलकर्णी , पोहवा ओमप्रकाश रेहपाडे , पोशि अनिल करडखेले , पोशि दुर्गेश डहाके ,यांनी यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर


महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन कुही
दुरध्वनी क्रमांक: ०७१००-२२२२२७
Email:ps.kuhi-ngp.r@mahapolice.gov.in
KABEL
WIRES & CABLES
AKALMAND BANO,
SURAKSHIT RAHO.